सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय ,नाशिक,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)**
दुरध्वनी क्र. ०२५३-२३१५०८०/२३१७१५१ E-Mail- ddmanashik@gmail.com फॅक्स क्र.०२५३- २५८१७००

**वाचा :** १. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चे कलम ३०, ३३, ३४,४१ व कलम ५१

२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचे कडील अधिसूचना क्र. करोना २०२० /प्र.क्र. ५८ आरोग्य ५ दिनांक १३ मार्च २०२०

३. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचे कडील अधिसूचना क्र. प्र.क्र. ५८ आरोग्य ५ दिनांक १४ मार्च २०२०

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण.**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक**
**क्र.कक्ष/ कोरोना विषाणू/१३०/२०२०**
**नाशिक दिनांक :-२१/०३/२०२०**

**आदेश**

_______ज्या अर्थी राज्य शासनाने संदर्भीय २ अन्वये करोना विषाणूचा ( कोव्हीड १९ ) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३,व ४ मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भीय ३ अन्वये प्रसिद्ध केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भीय २ अन्वये प्रसिद्धी केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

ज्याअर्थी आर्थिक वर्षाच्या कामकाजासाठी बँकांमध्ये मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असून त्याद्वारे कोरोना आजाराचा संसर्ग पसरण्याची शक्यता निर्माण झालेली आहे व करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून नाशिक जिल्ह्यामधील सर्व बँकांनी उपाययोजना करणे आवश्यक झाले आहे.

त्याअर्थी राज्य शासनाचे संदर्भीय २ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून **मी सुरज मांढरे, जिल्हाधिकारी , नाशिक जिल्ह्यामधील सर्व बँकांना खाली दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून काटेकोरपणे करण्याकरिता आदेशित करीत आहे.**

१. सर्व बँकांनी ३१ मार्च २०२० पर्यंत फक्त रोख भरणा करणे व काढणे ही दोनच कामे प्राधान्याने करावी.
२. बँकांनी एका वेळेस जास्तीत जास्त ४ ते ५ ग्राहकांना शाखेमध्ये येण्यास परवानगी द्यावी व प्रवेश केलेल्या ग्राहकांचे काम झाल्याशिवाय पुढील ग्राहकाला बँकेत आत प्रवेश देवू नये. दोन ग्राहकांमध्ये १ मीटरचे अंतर ठेवावे.
३. सर्व बँकांनी आपल्या ग्राहकांना इतर वितरण पर्यायाचा म्हणजेच इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग व युपीआय ,एटीएम, कॅश डीपाँझीट मशीन इ. सुविधांचा वापर करणेबाबतीत जागृती व आवाहन करावे.
४. बँकेत ग्राहकांना काऊन्टर पासून १ मीटर अंतर ठेवण्यास सूचित करावे.
५. सर्व बँकांनी आपल्या एटीएम, कॅश /चेक डीपाँझीट, पासबुक प्रिंटींग ई सेवा असणाऱ्या मशीनची वेळोवेळी स्वच्छता करावी. सर्व कर्मचाऱ्यांना व ग्राहकांना सॅनीटायझर, हँडवॉश,जंतुनाशक अथवा साबण हात धुण्याची व्यवस्था करावी.

तरी उपरोक्त निर्देशानुसार तात्काळ कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व आस्थापनांना सूचित करण्यात यावे त्याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

उपरोक्त आदेशाचे पालन न करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अथवा संस्थेने भारतीय दंडसंहिता १८६० (४५) याच्या कलम १८८ शिक्षेसपात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल आणि पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(**सुरज मांढरे**, भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नाशिक**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक**

**प्रती -** १. प्रबंधक, जिल्हा अग्रणी बँक नाशिक
२. जिल्हा निबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांना आपले अधिनस्त सर्व सहकारी बँकांना वरील आदेशाचे पालन करणेबाबत अवगत करावे.

**प्रत-** १. मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर
२. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर